Today गोंदिया

सकाळ

शनिवार १३ ऑक्टोबर २०१८ | ३

# कृषी विद्यापीठाद्वारे शिवारफेरीचे आयोजन

**गोंदिया :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला विद्यापीठाला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये पदार्पणानिमित्त तीनदिवसीय शिवारफेरीचे व चर्चासत्राचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र हिवराद्वारा करण्यात आले आहे. विदर्भातील शातकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या उद्देशाने विद्यापिठामध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके तसेच कृषी अवजारे यांची थेट माहिती आणि प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी शिवार फेरीचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे २१ आक्टोंबरला करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शिवारफेरीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राद्वारे करण्यात आले आहे.